नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/०१/२०२६ (गुरूवार)

नागपुर ग्रामीण जिल्हयात नववर्ष २०२६ स्वागत बंदोबस्त यशस्वीरित्या पार पडला, फार्महाउस तपासणीसाठी नेमण्यात आले होते २१ स्वतंत्र विशेष पथके

नविन वर्ष २०२६ चा स्वागतोत्सव दिनांक ३१/१२/२०२५ चे रात्री सर्वत्र साजरा करण्यात आला. त्यानिमित्याने नागरीक मोठ्या संख्येने पर्यटन स्थळ, रिसोर्ट, रेस्टॉरेन्ट, फॉर्म हाऊस, धाबे व इतर दर्शनीय स्थळी एकत्र येवून आनंद उत्सव साजरा एकत्रीत येणार असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांचा कडेकाट बंदोबस्त लावण्यात आला होता. नमुद बंदोबस्तात पर्यटन स्थळे, गर्दीचे ठिकाण इत्यादी ठिकाणी फिक्स पाईट बंदोबस्त नेमण्यात आला होता. वाहतुकीचे नियत्रंण, ड्रंक ॲड ड्राईव्ह कारवाई, गर्दीच्या ठिकणी पेट्रोलीग, नाकाबंदी व कोंम्बींग गस्त, संवेदनशील ठिकाणीची तपासणी आणि पेट्रोलींग पथके नेमण्यात आली होती. **तसेच लॉज, रिसोर्ट आणि फार्महाउस तपासणीसाठी सर्व २१ पोलीस स्टेशन मध्ये पोलीस स्टेशनचे पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांचे सह एक विशेष पथक तयार करण्यात आले होते. एकुण २१ विशेष पथकांनी त्यांच्या पोलीस स्टेशन हद्दीतील हॉटेल्स्, धाबे, लॉज, रिसोर्ट आणि फार्महाउस ची बंदोबस्ता दरम्यान तपासणी केली. नमुद पथकाने ७४ हॉटेल्स्, ५५ धाबे, ३६ लॉज, ३१ रिसोर्ट आणि ६३ फार्महाउस ची अवैध अंमली पदार्थ, अवैध दारू , इतर अवैध धंदे तसेच बेकायदेशिर कृत्यांबाबत सर्तकतेने तपासणी केल्याने कोणताही अनुचीत प्रकार घडला नाही. बंदोबस्तातील प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष रित्या सहभागी असलेल्या सर्व अधिकारी/ अंमलदाराचे त्यांचे कर्तव्य काटेकोरपणे बजावल्याने सदर बंदोबस्त यशस्वीरित्या पार पडला.**

नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे दिनांक २४/१२/२०२५ ते दि. ३१/१२/२०२५ रोजी पर्यंत विशेष मोहीम राबवुन ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह च्या ३९० कारवाई, १०लाख ४८ हजारांचा दंड आकरण्यात आला. अवैध दारू चे १५७ गुन्हे नोंदविले. १८ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

नाताळ सणानिमित्य तसेच नववर्षा निमित्य शासनाने दिनांक २४/१२/२०२५, दिनांक २५/१२/२०२५ व दि. ३१/१२/२०२५ रोजी रेस्टॉरेन्ट व इतर मनोरंजनात्मक आस्थापना यांना रात्री उशिरापर्यंत उघडया ठेवण्यास दिलेली मुभा पाहता ड्रंक ॲन्ड ड्राईव्हमुळे होणाऱ्या अपघाताला आळा बसण्याकरीता मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली संपुर्ण जिल्हयात दिनांक २४/१२/२०२५ ते दिनांक ३१/१२/२०२५ रोजीपर्यंत ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह, अवैध दारू तसेच इतर अवैध धंदयावर कारवाई कामी विशेष मोहीम राबविण्यात आली होती. **सदर विशेष मोहीमे अंतर्गत दिनांक २४/१२/२०२५ ते दिनांक ३१/१२/२०२५ रोजी पर्यंत मोटार वाहन कायदा कलम १८५ अन्वये ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह च्या एकुण ३९० कारवाई, तसेच विना हेल्मेट, विना परवाना, ओव्हर स्पीडच्या आणि इतर १५९८ कारवाई अशा एकुण १९७५ कारवाई करून एकुण १०,४८,६०० /— रूपयांचा दंड आकारण्यात आला आहे.**

त्याचप्रमाणे सदर विशेष मोहीमे अंतर्गत **दिनांक २४/१२/२०२५ ते दिनांक ३१/१२/२०२५** रोजी अवैध दारू विक्रेते, दारू काढणारे सेवन, तसेच वाहतुक कारणाऱ्यांवर कारवाई करत महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये विविध पोलीस स्टेशन अंतर्गत **एकुण १५७ गुन्हे नोंद** करण्यात आले असुन सदर कारवाईत देशी दारु, विदेशी दारू, मोहाफुल दारू ,वाहने असा **एकुण १८,९०,७८७/— रूपयांचा** मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

खुन करणाऱ्या आरोपीला तात्काळ केले अटक
काटोल पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन काटोल :— फिर्यादी नामे निलेश किसनाजी काळे, वय ४० वर्ष, रा. येनवा ता. काटोल,यांनी पोलीस स्टेशन काटोल येथे तोंडी रिपोर्ट दिली की, ३१/१२/२५ चे २१.३० वा ते २२.०० वा दरम्यान मौजा येनवा येथे फिर्यादी यांचा फिर्यादीचा मोठा भाऊ आरोपी राजेश किसनाजी काळे, वय ४२ वर्ष रा. येनवा, ता. काटोल व फिर्यादी चा लहान भाऊ मृतक हरिष किसनाजी राउत वय ३२ वर्ष रा. येनवा ता. काटोल यांच्या मध्ये पैशाच्या कारणावरून वादविवाद झाल्याने फिर्यादीचा मोठा भाऊ राजेश याने फिर्यादीचा लहान भाऊ हरिष याला विटाने मारहान करून जिवानाशी ठार केले. अशा रिपोर्ट वरून कलम १०३(१) भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हा केल्यानंतर नमुद आरोपी हा घटनास्थळावरून पळुन गेला. श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली.तसेच तपास पथकाला महत्वाच्या सुचाना दिल्या.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्गदर्शनात काटोल पोलीसांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे अवघ्या ३ तसात नमुद आरोपी नामे राजेश किसनाजी काळे, वय ४२ वर्ष, रा. येनवा, ता. काटोल याला येनवा जंगल परीसरातुन ताब्यात घेतले. आरोपीला दिनांक ०१/०१/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपीचा दिनांक ०२/०१/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे.

नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर/खेळणाऱ्यांवर ०५ गुन्हे नोंद.
एकुण २,७२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

दिनांक ३१/१२/२०२५ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन रामटेक, कुही, काटोल यांनी अवैधरित्या सट्टापट्टी खेळणाऱ्या तसेच ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सटट्यापटट्री साहित्य, ५२ ताशपत्ते व रोख रक्कम असा **एकुण २,७२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला**. महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये एकुण **०५ गुन्हे दाखल** करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे आहेत.

पोलीस स्टेशन कुही अंतर्गत मौजा बाजार चौक कुही, मौजा चांपा मोहीते सावजी ढाबा, मौजा मांढळ येथे **आरोपी क्र. १) नामदेव विश्वनाथ चाचरकर, वय ६० वर्ष, रा. वार्ड क्र ०६, बाजार चौक कुही २) महेंद्र गोविदराव काबळे, वय ५० वर्ष, रा. चांपा, वस्ती ता. उमरेड ३) कवडु यशवंत डहारे, वय ३२ वर्ष, रा. मांढळ. ता. कुही** हे कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतानां मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी १,४९५/— रूपये असा एकुण १,६१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यांचेवर प्रत्येक १ गुन्हा एकुण ३ गुन्हे नोंद करण्यात आले.

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत महादुला येथे **आरोपी नामे १) संजय उरकुडा धुर्वे, २) नागोराव गोमा इडपाची, ३) धनराज आसाराम भोस्कर ४) बालदंच भोस्कर, सर्व रा. महादुला, ता. रामटेक जि. नागपुर** हे लोकांकडुन पैसे घेवुन ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळताना मिळुन आले. आरोपीतांचे ताब्यातून ५२ ताशपत्ते व नगदी असा एकुन ५९०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत पेठबुधवार मोक्षधाम जवळ काटोल येथे **आरोपी नामे— नितीन रामदास शिरपुरकर, रा. पेठबुधवार काटोल** हा कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतानां मिळुन आल्याने त्याचे ताब्यातून सट्टापट्टी साहित्य व नगदी ५२०/—रूपये असा एकुण ५२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने